प्रेस नोट दि - १३/०५/२०१९

---

**गजानन मारणे व छोटा राजन टोळीतील गुंड जेरबंद, दोन पिस्टल व तीन काडतुसे हस्तगत**

---

दिनांक - १२/०५/२०१९ रोजी गुन्हे शाखा युनिट ३ पुणे येथील अधिकारी व कर्मचारी हददीमध्ये गस्त घालत असताना पोलीस हवालदार प्रशांत पवार व पोलीस नाईक सचिन गायकवाड यांना त्यांचे खब-याकडुन मिळालेल्या बातमीवरुन साई पॅलेस बार जवळील रिक्षा स्टॅन्ड पोडरोड समोर कोथरुड पुणे या ठिकाणी पोलीस अभिलेखा वरील सराईत गुन्हेगार जमीर मोहिद्दीन शेख वय - २६ वर्षे रा. मु.पो. भुगाव ता. मुळशी जि.पुणे व त्याचा साथीदार अजय सुभाष चक्रनारायण वय - २३ वर्षे रा - स.नं. - १ लक्ष्मी मंदिराजवळ पाषाण पुणे यांना संशयीत रित्या फिरत असताना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे ताब्यातून दोन देशी बनावटीचे पिस्टल व तीन जिवंत काडतुसे असा एकूण एक लाख एकवीस हजार पाचशे रुपयाचा माल जप्त करण्यात आलेला आहे.

**जमीर शेख हा गजानन मारणे टोळीतील सदस्य असून तो पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार आहे. त्याचे विरुध्द कोथरुड पोलीस स्टेशन येथे गंभीर दुखापतीचे दोन, दुखापतीचे दोन, विनयभंगाचा एक, हत्यार जवळ बाळगणेचा एक व उत्तमनगर पोलीस स्टेशन पुणे येथे अपहरणाचा एक असे एकुण सात गुन्हे दाखल आहे. तसेच अजय चक्रनारायण हा राजेंद्र सदाशिव निकाळजे ऊर्फ छोटा राजन टोळीशी संबधीत महाराष्ट्र राज्य जनरल माथाडी कामगार संघटना कोथरुड विभाग पुणे चा अध्यक्ष आहे . तो छोटा राजन टोळीतील सक्रीय सदस्य आहे.** त्यांचेविरुध्द कोथरुड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर - १६४/२०१९ आर्म ॲक्ट कलम ३, ५, २५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी शस्त्रे कशासाठी जवळ बाळगली ? त्यांचेजवळ आणखी पिस्टल व काडतुसचा साठा आहे काय ? आणखी शस्त्रे विकली आहे काय ? तसेच त्याचे इतर साथीदार कोण आहेत याबाबत तपास चालू आहे. मा. श्रीमती एस. एस. मतकर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, कोर्ट नं १ शिवाजीनगर पुणे यांनीह आरोपीस दि - १६/०५/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त गुन्हे प्रदिप देशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिपक निकम, पोलीस उप निरी श्री. संजय गायकवाड, किरण अडागळे, व पोलीस कर्मचारी प्रशांत पवार, मच्छिंद्र वाळके, गजानन गानबोटे, दत्तात्रय गरुड, दिपक मते, सचिन गायकवाड, अतुल साठे, संदीप राठोड, विल्सन डिसोझा, रोहीदास लवांडे, सुजित पवार यांनी केली आहे . गुन्हयाचा पुढील अधिक तपास पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड हे करीत आहेत.